महाराष्ट्र शासन
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, गोंदिया
कुंवर तिलकसिंह सामान्य रुग्णालय परिसर, नेहरु चौक, गोंदिया, महाराष्ट्र
फोन नं. ०७१८२-२३८०९० ई मेल :gmcgondiya@gmail.com

क्र.शावैमगों/आस्थापना १,२/अ.अ./जा/६०६५/२६ दिनांक: १२/०७/२०२६

## जाहिरात

विषय:- वैद्यकीय शिक्षण व संशोधन मुंबई यांच्या अधिपत्याखालील शासकिय वैद्यकीय महाविद्यालय, गोंदिया येथील विविध विषयातील प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक व सहाय्यक प्राध्यापक या संवर्गातील रिक्त पदांवर अभ्यागत अध्यापक (Visiting Faculty) मध्यवर्ती निवड प्रक्रियेमार्फत (३६४ दिवसांकरीता) तात्पुरत्या पध्दतीने भरण्याबाबत.....

संदर्भ :- १) शासन निर्णय,वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, क्र.MEDD-12/26/2026-MMD(Vais-2)/1574791 दिनांक: १३ मार्च २०२६
२) शासन निर्णय,वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,शा.शुध्दीपत्रक क्र.MED- 12/26/2026-MMD(Vais-2)/1574791 दिनांक: २३ मार्च २०२६

उपरोक्त विषयानुसार संदर्भाधिन संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्या अधिपत्याखालील शासकिय वैद्यकीय महाविद्यालय,गोंदिया येथील प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक व सहाय्यक प्राध्यापक या रिक्तपदांवर राष्ट्रीय वैद्यक आयोगाने दिनांक १४.०८.२०२१ रोजी प्रसिध्द केलेल्या प्रारुप मागर्दशक सुचनांमध्ये अभ्यागत अध्यापक (Visiting Faculty) नियुक्त करण्याबाबत निर्देश दिलेले आहे. त्या निकषाच्या अधिन राहुन या महाविद्यालयातील अभ्यागत अध्यापक (Visiting Faculty) पदांकरीता पात्र उमेदवारांकडुन खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून अर्ज मागविण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | उमेदवारांनी अर्ज सादर करावयाचा कालवधी | दि. १५/०७/२०२६ ते दि. २४/०७/२०२६ संध्या ५.०० वाजेपर्यंत (सुटटीचे दिवस वगळुन) |
| २ | मुलाखतीचा दिनांक | उपरोक्त कालावधीनंतर अर्जाची छाननी तसेच पडताळणी झाल्यानंतर मुलाखतीची तारीख उमेदवारांना स्वतंत्ररित्या कळविण्यात येईल. |
| ३ | मुलाखतीचे ठिकाण | शासकिय वैद्यकीय महाविद्यालय, गोंदिया |

अभ्यागत अध्यापक (Visiting Faculty) भरावयाच्या पदांचा तपशील

| | | |
|---|---|---|
| १ | प्राध्यापक संवर्ग (एकुण रिक्त पदे - ११) | अभ्यागत अध्यापक(एकुण -०२) |
| २ | सहयोगी प्राध्यापक संवर्ग (एकुण रिक्त पदे -०२) | अभ्यागत अध्यापक(एकुण -०१) |
| ३ | सहाय्यक प्राध्यापक संवर्ग (एकुण रिक्त पदे - १२) | अभ्यागत अध्यापक(एकुण -०४) |

अटी व शर्टी :-

१) अभ्यागत अध्यापक (Visiting Faculty) म्हणून नियुक्ती ही राष्ट्रीय वैद्यक आयोगाच्या मार्गर्शक सूचनांनुसार व त्यात वेळोवेळी होण्याऱ्या बदलानुसार करण्यात येईल तसेच अशा प्रकारे अध्यापकांची नियुक्ती ही संबंधित संवर्गातील पदांच्या कमाल दहा टक्के इतकी राहील.

२) अध्यापकांची पात्रता, अनुभव, अध्यापकांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या नियुक्ती कालवधी व इतर अटी शर्ती हया राष्ट्रीय वैद्यक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनानुसार राहतील.

३) सदर अध्यापकांना एकत्रित मानधन राहील. सदर अध्यापकांना मानधन हे प्रतिसत्र रु.१०००/- व कमाल मासिक मानधन रु. २४०००/- इतकी अनुज्ञेय राहील. याकरिताचा खर्च हा संस्थेच्या पीएलए खात्यातुन करण्यात येईल.

Scanned with OKEN Scanner

४) सदर अध्यापकांना एकत्रित मानधनाव्यतिरिक्त अन्य कोणतेही भत्ते लागू राहणार नाहीत.
५) अध्यापकांची नियुक्ती ही अधिष्ठाता यांचे अध्यक्षतेखालील समितीमार्फत करण्यात येईल व त्यास आयुक्त वैद्यकीय शिक्षण, मुंबई यांची मान्यता आवश्यक राहील.
६) अभ्यागत अध्यापक म्हणुन अध्यापकांची नियुक्ती एक वर्षासाठी राहील. अध्यापकांच्या कामगिरी मुल्यमापनानंतर तो कालावधी दोन वर्षापर्यंत वाढवता येईल. दोन वर्षानंतर नवीन निवड प्रक्रियेव्दारे पुन्हा नियुक्ती देता येईल.

आपला विश्वासू

(डॉ.कुसुमाकर घोरपडे)
अधिष्ठाता
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
गोंदिया.

प्रति:- १) कार्यालयीन संकेत स्थळ, संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई.
२) सूचना फलक, शासकिय वैद्यकीय महाविद्यालय, गोंदिया.

प्रत माहिती स्तव :-
१) मा. आयुक्त वैद्यकीय शिक्षण व आयुष विभाग, मुंबई.
२) सर्व अधिष्ठाता, शासकिय वैद्यकीय महाविद्यालय, महाराष्ट्र राज्य.

Scanned with OKEN Scanner